रोजगार हमी योजना विभागाच्या नवीन प्रशासन भवन, १६वा मजला येथील पश्चिम बाजू कडील मोकळ्या जागेत बैठक व्यवस्था / नुतनीकरणास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आस्थाप-२०१६/प्र.क्र.११७/मग्रारो-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९ सप्टेंबर, २०१७

वाचा : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: शाकाजा-१११५/प्र.क्र. २१८/२०१५/२२ दिनांक: २४.०२.२०१६

**प्रस्तावना :**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २४.२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला येथे रिफ्युजी फ्लोअर करिता आरक्षित असलेली ७७५ चौ.फु. जागा सोडून उर्वरित शिल्लक राहणाऱ्या २५० चौ.फु. जागा नियोजन विभाग (रो.ह.यो.) यांना सामाजिक अंकेक्षण संचालनालयाच्या कार्यालयाकरिता वाटप करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने बैठक व्यवस्था व त्यासोबत विभागाच्या बैठकीसाठी सभागृह असे नियोजन करुन नुतनीकरणासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात आले. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी रु. १३,३०,६०९/- (रु. तेरा लाख तीस हजार सहाशे नऊ फक्त) इतक्या रकमेचे खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय तसेच वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –:**

नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला येथे रिफ्युजी फ्लोअर करिता आरक्षित असलेली ७७५ चौ.फु. जागा सोडून उर्वरित शिल्लक नियोजन (रो.ह.यो.) विभागास वाटप करण्यात आलेल्या २५० चौ.फु. मोकळ्या जागेवर बैठक व्यवस्था व त्यासोबत विभागाच्या बैठकीसाठी सभागृह असे नियोजन करुन नुतनीकरणाचे काम करण्याकरीता कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या रु. १३,३०,६०९/- (रु. तेरा लाख तीस हजार सहाशे नऊ फक्त) इतक्या खर्चाच्या सादर केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर नुतनीकरणाचे काम करताना खालील अटींचे पालन करणे अनिवार्य राहील :-

क. नव्याने करण्यात येणारे फर्निचर व लाकडी दुभाजक तसेच इतर लाकडी सामान हे आग प्रतिबंधक प्रक्रिया केलेले असावे.

ख. फ्लोअरिंगचे काम करत असताना १५ व्या मजल्यावर पाण्याची गळती होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

ग. इमारतीच्या मूळ संकल्पचित्र आराखडयात काहीही बदल करु नयेत अथवा त्यांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. सदरचा खर्च मागणी क्रमांक "ओ-३ मुख्यशिर्ष - २५०५- ग्रामीण रोजगार- ६०- इतर कार्यक्रम- ००१-रोजगार हमी योजना- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१)(०१) रोजगार हमी योजना (२५०५ ००२२) (खर्चाचे उद्दिष्ट संकेतांक- १३ कार्यालयीन खर्च )" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर रक्कम **"कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग (सा.बां.वि.), मुंबई यांना आहरण व संकेतांक क्रमांक ७१०१ ९०३६९६"** वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.वि.) मुंबई यांना हा खर्च करण्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांनी यासंदर्भात केलेल्या खर्चाचा तपशील या विभागास त्वरीत सादर करावा.

५. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग व नियोजन विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २८७/४०८/व्यय-८, दिनांक १४.०८.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२९१६०९२११५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr. Pramod Sopan Shinde

Digitally signed by Dr. Pramod Sopan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86df3b89584863ae114ab9dcc19318acf0e1e94714d4f3f2196a35403313b298, cn=Dr. Pramod Sopan Shinde
Date: 2017.11.01 16:06:45 +05'30'

( डॉ. प्रमोद शिंदे )
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) प्रधान सचिव (वित्त) व सचिव (लेखा व कोषागारे) वित्त विभाग मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
३) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४) सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई.

६) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई.

७) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

८) रोख शाखा (का-१४२२), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. (मुळ देयकासह पुढील कार्यवाहीसाठी)

९) सहाय्यक संचालक (लेखा), मग्रारो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.